# भुयारी कामाच्या कंपनांची तीव्रता होणार कमी

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ अंतर्गत एमएमआरसीने स्विस कंपनीच्या मशीनच्या साहाय्याने हाय व्हायब्रेशन अटेन्युएशन बुटेड ट्वीन स्लीपर ब्लॉक्सची निर्मिती सुरू केली आहे. कंपनांची तीव्रता कमी करण्यासाठी ही पद्धत सर्वोत्तम आहे. ही ट्रॅक यंत्रणा अद्ययावत असून, स्लीपर बॉक्सची निर्मिती वडाळा येथे सुरू आहे. अशा प्रकारचे आणखी एक मशीन लवकरच उपलब्ध होईल.

अशा प्रकारचे ट्रॅक्स भारतात प्रथमच वापरण्यात येत आहेत. सर्वसाधारण मेट्रो ट्रॅक्सची २२ व्हीडीबी इतकी कंपन शोषण क्षमता असते. मात्र, स्लीपर बॉक्समुळे ट्रॅक्सची कंपन शोषण क्षमता जास्त कमी होईल. मुंबई शहरासाठी ही सक्षम यंत्रणा अतिशय योग्य आहे, कारण येथे संवेदनशील इमारती, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, चित्रीकरण स्टुडिओ आहेत. संपूर्ण प्रकल्पाला २ लाख ९ हजार आणि सहाशे इतके स्लीपर ब्लॉक्स लागणार असून, अशा प्रकारची २ मशिन्स महिन्याला १२ हजार स्लीपर ब्लॉक्सची निर्मिती करतील.

> कंपनांची परिणामकारकता कमी करण्यासाठी ही पद्धत सर्वोत्तम आहे. स्लीपर बॉक्सची निर्मिती करण्यासाठी ही एकूण प्रक्रिया तज्ज्ञांच्या देखरेखीखाली पार पडत आहे.
>
> - एस. के. गुप्ता, प्रकल्प संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन